**सन २०१९-२० करिता विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत मंजूर "IITians pace Education-Super ५० Tribal students selected from engineering & medical aspirants for competitive exams and Olympiads" या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांना मंजूरी देणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः केंद्रीय-२०१९/प्र.क्र. ४९ /का-१९**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२**
**तारीख: ०२/०८/२०१९**

**संदर्भ-**

**जनजाती कार्य मंत्रालय,नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०१/२०१९-Grants,दि.११/०३/२०१९**

**प्रस्तावना-**

महाराष्ट्रामध्ये सद्यस्थितीत ४९१ शासकीय आश्रम शाळा, २५ एकलव्य निवासी आश्रम शाळा व ११ इंग्रजी माध्यमाच्या आश्रमशाळा कार्यरत आहेत. या शासकीय आश्रम शाळेच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी आदिवासी विकास विभागाची आहे. त्यांचे आरोग्य, पोषण व शिक्षण योग्य प्रकारे व्हावे यासाठी विभागामार्फत विविध योजना राबविल्या जातात. आदिवासी विभागामार्फत विद्यार्थांच्या गुणवत्ता वाढ व सर्वांगीण विकासाकरिता मिशन शौर्य, कायापालट अभियान, कराडी पाथ इंग्रजी प्रशिक्षण, एकलव्य विज्ञान प्रशिक्षण, गेमिफाईड लर्निंग लॅब यांसारखे विविध उपक्रम राबविले जात असून आश्रम शाळेतील विद्यार्थी सद्यस्थितीला विविध क्षेत्रात नावलौकिक प्राप्त करत आहेत.

२. केंद्र शासनाकडून दरवर्षी विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत अनुदान, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत व अदिम जमाती विकास कार्यक्रम या योजनाअंतर्गत राज्य शासनास अनुदान प्रदान होत असते. या योजनाअंतर्गत प्राप्त होणा-या अनुदानासाठी नावीन्यपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्रकल्प कार्यालय,शासकीय, अशासकीय/ सामाजिक /खाजगी संस्था यांना आदिवासी विकास विभागाकडून आवाहन करण्यात आलेले होते. यानुषंगाने प्राप्त झालेल्या प्रस्तावांची सविस्तर छाननी करून निवडक प्रस्ताव मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समितीकडे सादर करण्यात आले. सदर निवडक प्रस्तावांमध्ये IITians Pace Education यांच्या प्रस्तावाचा समावेश आहे. सदर प्रस्ताव मुख्यत्वे आदिवासी आश्रमशाळांतील दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय परिक्षा घेवून Super-५० ची बॅंच तयार करून त्यांना ११ वी,१२ वी CBSE अभ्यासक्रमासोबतच वैद्यकीय,अभियांत्रिकी प्रवेशपरीक्षांबाबत निवासी प्रशिक्षण देऊन त्यांना देशातील नामवंत संस्थांमध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे याबाबत आहे.

३. १९९९ मध्ये संस्थापित "पेस" ही अभियांत्रिकी आणि वैद्यकीय स्पर्धा परिक्षांसाठी मार्गदर्शन करणारी दर्जेदार व नामांकित संस्था असून जगातील दर्जेदार विद्यापीठे जसे एम.आय.टी., स्टॅनफोर्ड विद्यापीठ आणि कॉरनेल विद्यापीठ यांनी पेस संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे कौतुक केले आहे. पेस दरवर्षी १०० हून अधिक विद्यार्थ्यांना आय.व्ही.वाय लीगच्या अव्वल स्थानी पाठवते .सीबीएसई (CBSE) बोर्डाने उडान

(UDAAN) या शैक्षणिक उपक्रमासाठी देखील पेसच्या शिक्षक समूहावर विश्वास दर्शविला. पेस संस्थेचे दरवर्षी १५०० विद्यार्थी आयआयटी/एम्स/वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेत आहेत. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाड मधील (भौतिक शास्त्र , रसायन शास्त्र , खगोल शास्त्र, जीव शास्त्र, गणित इ.) या परीक्षांमध्ये १२ सुवर्ण, ७ रजत आणि २ कांस्य पदके पटकाविले आहेत. PACE Educational Trust द्वारे व्यवस्थापित वागड पेस ग्लोबल स्कूल, विरार, जि. पालघर या निवासी शाळेमध्ये ११ वी , १२ वी च्या CBSE अभ्यासक्रमासोबतच अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश परीक्षांसाठी निवासी प्रशिक्षण दिले जाते.

४. आश्रमशाळांमधील गुणवंत विद्यार्थांना वैद्यकीय व अभियांत्रिकीसाठी नामवंत संस्थांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण उपलब्ध करून दिले तर IIT-JEE, NEET, AIEEE यांसारख्या परीक्षा उत्तीर्ण होऊन नामवंत शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळविणे सोपे जाईल. या उद्देशातून आदिवासी विकास विभागाने कार्यकारी समिती व शासनाच्या मान्यतेने ही योजना राबविण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्तावित केली. जनजाती कार्य मंत्रालयाने दिनांक १२.०२.२०१९ रोजी आयोजीत केलेल्या Project Appraisal Committee (PAC ) बैठकीमध्ये **"IITian pace Education-Super ५० Tribal students selected from engineering & medical aspirants for competitive exams and Olympiads"** हि योजना सन २०१९-२० करिता विशेष केंद्रीय सहाय्य योजने अंतर्गत IITians Pace Education संस्थेमार्फत राबविण्यासाठी रू.५१२.०० लक्ष इतक्या रकमेच्या प्रस्तावास संदर्भाधिन पत्रान्वये मंजुरी दिलेली आहे.

५. उपरोक्त मंजुर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विद्यार्थ्यांच्या निवडपरिक्षेचे स्वरूप,पद्धती ठरविण्यासाठी दि.०३.०६.२०१९ रोजी आयुक्तालय,आदिवासी विकास,नाशिक येथे बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सन २०१९-२० शैक्षणिक सत्राचे विद्यार्थ्यांचे नुकसान होवू नये म्हणून सुयोग्य विद्यार्थ्यांची तातडीने निवड करणे आवश्यक असल्याने बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने दि.२८.०६.२०१९ रोजी निवड परिक्षा आयोजित करण्यासाठी शासन पत्र दि.०६.०६.२०१९ अन्वये मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या.

६. अभियांत्रिकी व वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशपरिक्षा निवासी प्रशिक्षणासाठी ५० विद्यार्थ्यांची निवड करण्याकरिता अंमलबजावणी यंत्रणेमार्फत परिशिष्टामध्ये नमूद मार्गदर्शक सुचनांनुसार शालेयस्तरावर प्रथम निवड परिक्षा दि.२८.०६.२०१९ व अप्पर आयुक्त दुस-या टप्प्याची परिक्षा दि.१४.०७.२०१९ रोजी आयोजित करण्यात आली. सदर निवड परिक्षेच्या निकालाचे विश्लेषण करून ३४ विद्यार्थ्यांची अभियांत्रिकी व १६ विद्यार्थ्यांची वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशपरीक्षा निवासी प्रशिक्षणासाठी अंतिम निवड करण्यात आली .

७. सबब, विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत मंजूर"IITian pace Education- Super ५० Tribal students selected from engineering & medical aspirants for competitive exams and Olympiads" योजनेअंतर्गत ५० विद्यार्थ्यांना वागड पेस ग्लोबल स्कूल, विरार , जि पालघर . या निवासी शाळेमध्ये ११ वी , १२ वी च्या CBSE अभ्यासक्रमासोबतच अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश परीक्षांसाठी IITian-Pace Education या संस्थेमार्फत निवासी प्रशिक्षण देण्याबाबतच्या योजनेच्या मार्गदर्शक सूचनांना मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

**शासन निर्णय-**

आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना वैद्यकीय व अभियांत्रिकीसाठी नामवंत संस्थांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी IIT JEE, NEET यांसारख्या प्रवेश परीक्षांसाठी प्रशिक्षण तसेच ११ वी व १२ वी साठी CBSE अभ्यासक्रमासह निवासी शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या कार्यक्रमार्तंगत विशेष केंद्रिय सहाय्य अंतर्गत मंजूर “IITians Pace Education- Super ५० Tribal students selected from EMRS for engineering & medical aspirants for competitive exams and Olympiads” ही योजना IITian Pace Education संस्था व आदिवासी विकास विभाग यांच्यामार्फत संयुक्तपणे राबविण्यासाठी एकुण रु. ५१२.०० लक्ष किंमतीच्या अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांना या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या परिशिष्ट - १ नुसार मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वितरीत तरतूदींच्या मर्यादेत योजना राबविण्याबाबत त्वरीत कार्यवाही आयुक्त, आदिवासी विकास ,नाशिक यांनी करावी व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०२१०५६२०८४२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Shivaji Jadhav

Digitally signed by Santosh Shivaji Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f635bf4a671627c02b82e6a01acb4a38afc24f58a5534a9d1271fe258a564b0, serialNumber=b8ee819ccc335cea98640b72c63671dd013899d3601f09ce4ea340e1741652a0, cn=Santosh Shivaji Jadhav
Date: 2019.08.02 11:11:28 +05'30'

**( संतोष जाधव )**
कार्यासन अधिकारी

**प्रत,**

१. मा.मंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई
२. मा.राज्यमंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव,आदिवासी विकास यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई
४. आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक.
५. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
६. सहसचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
७. उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. अपर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक,ठाणे अमरावती व नागपूर .
९. सर्व प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
१०. संचालक, IITians Pace Education संस्था मुंबई
११. संचालक,PACE Educational Trust,मुंबई
१२. मुख्याध्यापक, वागड पेस ग्लोबल स्कूल, विरार , जि. पालघर
१३. संगणक समन्वयक,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
१४. निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई

## विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत मंजूर योजना- सन २०१९-२०

**परिशिष्ट-१** (रुपये लाखात)

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | "IITians Pace Education- Super ५० Tribal students selected from engineering & medical aspirants for competitive exams and Olympiads" |
| २ | **योजनेचे प्रस्तावित लाभ क्षेत्र** | अप्पर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक,ठाणे,अमरावती व नागपूर यांचे कार्यक्षेत्र |
| ३ | **वित्तीय तरतूद** | (खालील तक्ता) |
| ४ | **या योजनेत येणारे खर्चाचे अंदाजपत्रक** | (खालील तपशील) |

**३ वित्तीय तरतूद**

| अ.क्र | वर्ष | विशेष केंद्रिय सहाय्य अंतर्गत मंजूर योजना | निधी (लक्ष.रू) |
|---|---|---|---|
| १ | २०१४-१५ | Talent Search mission, merit counseling and vocational education" | **१००.००** |
| २ | २०१९-२० | IITians Pace Education- Super ५० Tribal students selected from engineering & medical aspirants for competitive exams and Olympiads | **५१२.००** |

**४ या योजनेत येणारे खर्चाचे अंदाजपत्रक**

**लाभार्थींची संख्या- एकूण ५० विद्यार्थी (३४ अभियांत्रिकी व १६ वैद्यकीय)**

योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चाचे सविस्तर अंदाजपत्रक -

**A) अभियांत्रिकीसाठी प्रति विद्यार्थी खर्च रक्कम (२ वर्षांसाठी) (लक्ष रुपये)**

| अ. क्र | खर्चाची बाब | एकूण खर्च/ विद्यार्थी | आ.वि.वि ने करावयाचा खर्च प्रति विद्यार्थी |
|---|---|---|---|
| १ | प्रशिक्षण फी | ७.०८** | ३.५४ (५०% फी सवलत) |
| २ | वस्तीगृह फी | ४.०० | ४.०० |
| ३ | शाळा फी | ३.४५ | ३.४५ |
| ४ | NCERT ची पुस्तके | ०.०१ | ०.०१ |
| ५ | Pace-OLAA | ०.५०** | ०.२५ (५०% सवलत) |
| | **एकूण** | **१५.०४** | **११.२५** |

**B) वैद्यकीयसाठी प्रति विद्यार्थी खर्च रक्कम (२ वर्षांसाठी) (लक्ष रुपये)**

| अ. क्र | खर्चाची बाब | एकूण खर्च/ विद्यार्थी | आ.वि.वि ने करावयाचा खर्च |
|---|---|---|---|
| १ | प्रशिक्षण फी | ४.४२** | २.२१ (५०% फी सवलत) |
| २ | वस्तीगृह फी | ४.०० | ४.०० |
| ३ | शाळा फी | ३.४५ | ३.४५ |
| ४ | NCERT ची पुस्तके | ०.०१ | ०.०१ |
| ५ | Pace-OLAA | ०.५०** | ०.२५ (५०% सवलत) |
| | **एकूण** | **१२.३८** | **९.९२** |

| | | |
|---|---|---|
| | | ** योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने कोचिंग फी तसेच Pace-OLAA चे प्रती विद्यार्थी फीपैकी ५० % फीसाठी पेस संस्थेमार्फत सवलत देण्यात आलेली आहे.<br>सर्व कर हे अंमलबजावणी यंत्रणेमार्फत अदा करण्यात येतील. |
| ५ | **योजना राबवणारी यंत्रणा** | आयुक्त ,आदिवासी विकास,नाशिक , IITian-Pace Education Pvt Ltd व PACE Educational Trust द्वारे व्यवस्थापित वागड पेस ग्लोबल स्कूल, विरार,जि.पालघर |
| ६ | **नियंत्रक अधिकारी** | सनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| ७ | **योजनेचा उद्देश/ हेतु** | १. आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेशपरीक्षांसाठी आवश्यक असलेल्या IIT-JEE,AIEEE,NEET यांसारख्या प्रवेश परीक्षांबाबत प्रशिक्षण त्याचबरोबर ११ वी,१२ वी साठी CBSE अभ्यासक्रमासह निवासी शिक्षण उपलब्ध करून देणे .<br>२. जास्तीत जास्त आदिवासी विद्यार्थ्यांना देशातील नामवंत संस्थांमध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे. |
| ८ | **योजना अंमलबजावणीची कार्यपध्दती** | **योजना राबविण्याची कार्यपद्धती -**<br>१) अभियांत्रिकी व वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशपरिक्षा प्रशिक्षणासाठी ५० विद्यार्थ्यांची निवड ही राज्यातील आदिवासी शासकीय आश्रम शाळा , आदिवासी अनुदानित आश्रम शाळा ,नामांकित व एकलव्य निवासी आश्रम शाळांमधील मार्च-२०१९ मध्ये १० वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमधून असेल.<br>२) विद्यार्थ्यांच्या निवडीसाठी शालेय स्तरावर तसेच अप्पर आयुक्त स्तरावर वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या दोन स्वतंत्र निवड परीक्षा घेतल्या जातील .<br>३) अभियांत्रिकी निवडपरीक्षा अभ्यासक्रम दर्जा- १० वी च्या दर्जाचे गणित विषय ज्ञान आणि बुद्धिमत्ता .<br>४) वैद्यकीय परिक्षा परीक्षा अभ्यासक्रम-१० वी च्या दर्जाचे भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, रसायनशास्त्र .<br>५) एकूण निवडलेल्या ५० सुपर यादीमध्ये ५०% प्रमाण विद्यार्थीनींचे असेल.<br>६. वैद्यकीय व अभियांत्रिकी साठी घेण्यात येणाऱ्या चाळणी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सुपर ५० विद्यार्थ्यांची अंतिम निवड करून संबंधितांना कळविले जाईल व त्यानंतरचे प्रत्येकी १० विद्यार्थ्यांची प्रतीक्षा यादी तयार केली जाईल.<br>७. या परीक्षेतून निवड झालेल्या ५० सुयोग्य गुणवंत विद्यार्थ्यांना PACE Educational Trust द्वारे व्यवस्थापित वागड पेस ग्लोबल स्कूल, विरार , जि. पालघर या निवासी शाळेमध्ये ११ वी , १२ वी च्या CBSE अभ्यासक्रमासोबतच अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश परीक्षांसाठी निवासी प्रशिक्षण दिले जाणार आहे.<br>८. योजनेच्या अनुषंगाने निवड करण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत किमान पात्रता निकष -<br>➢ विद्यार्थी आदिवासी विकास विभागाचे शासकीय /नामांकित/अनुदानित/एकलव्य |

| | | |
|---|---|---|
| | | निवासी शाळेमध्ये इयत्ता दहावीची परीक्षा मार्च -२०१९ मध्ये देवून उत्तीर्ण झालेला असावा.<br>➢ सदर विद्यार्थी अधिसूचनेत नमूद अनुसूचित जमातीचा असावा<br>➢ निवडीसाठी संबंधित विद्यार्थ्याला निवड परीक्षा दिलेली असावी.<br>➢ विद्यार्थ्यांच्या निवडीबाबत संपूर्ण प्रक्रिया अंमलबजावणी यंत्रणा पार पाडतील .<br>९.निवड झालेल्या विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पुढील प्रमाणे -<br>i) निवड झालेले विद्यार्थी/ विद्यार्थिनी यांना प्रवेश परिक्षा प्रशिक्षण व CBSE अभ्यासक्रमासाठी “वागड पेस ग्लोबल स्कूल विरार जि. पालघर ” या ठिकाणी प्रवेश दिला जाईल .सदर प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना खालील कागदपत्रे जमा करतील.<br>I. आधार कार्ड ,<br>II. शाळा सोडल्याचा दाखला<br>III. जात प्रमाणपत्र<br>IV. १० वी चे गुण प्रमाणपत्र<br>V. जन्म तारखेचा दाखला<br>VI. स्थलांतर प्रमाणपत्र<br>VII. पालकांचे ओळखपत्र व निवासाचा पुरावा<br>१०. जर काही कारणास्तव सुपर ५० मधील एखाद्या विद्यार्थाने प्रवेश घेतला नाही तर प्रतीक्षा यादीतील गुणानुक्रमानुसार पुढील विद्यार्थ्याला प्रवेश दिला जाईल .<br>११. अंमल बजावणी यंत्रणेमार्फत अभ्यासक्रमाला प्रवेश मिळाल्यानंतर पुढील सोयी उपलब्ध करून दिल्या जातील .<br>➢ वागड पेस ग्लोबल स्कूल या ठिकाणी २ वर्षाकरिता प्रवेश दिला जाईल<br>➢ त्या ठिकाणी CBSE वर आधारित असलेले ११ वी व १२ वी चे शिक्षण दिले जाईल.<br>➢ विद्यार्थ्यांना मेडिकल व इंजिनीअरिंग प्रवेशपरिक्षेसाठी प्रशिक्षण दिले जाईल.<br>➢ होस्टेल ,मेस ची सुविधा .<br>➢ PACE-OLAA टैबलेट , पुस्तके व प्रकरणानिहाय नोट्स दिल्या जातील<br>➢ प्रयोगशाळा ,ग्रंथालय ,जिम तसेच इतर आवश्यक सुविधा पुरविल्या जातील.<br>➢ प्रवेशित विद्यार्थ्यांना CBSE बोर्ड परिक्षा संपल्यानंतरही सर्व वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेशपरिक्षा होईपर्यंत प्रशिक्षण व निवास व्यवस्था पुरविणे संस्थेला बंधनकारक असेल.तसेच संस्था सदर विद्यार्थ्यांना नामवंत विद्यालयांमध्ये प्रवेशासाठी आवश्यक समुपदेशन (Counseling)/मार्गदर्शन/पाठपुरावा करेल. |
| ९ | **योजनेच्या अटी व शर्ती** | १) योजना विहित वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेची असेल.<br>२) योजनेच्या अनुषंगाने निवड करण्यात आलेला विद्यार्थी हा अनुसुचित जमातीचा असणे बंधनकारक राहील.<br>३) वैद्यकीय व अभियांत्रिकी साठी सुपर ५० विद्यार्थ्यांची निवड करण्याची प्रक्रिया पूर्णतः अंमलबजावणी यंत्रणेची असेल. आयुक्त आदिवासी विकास, नाशिक, सर्व अप्पर आयुक्त, आदिवासी विकास , व प्रकल्प अधिकारी हे विद्यार्थांना सदर योजनेबाबत |

| | | |
|---|---|---|
| | | माहिती देतील व विद्यार्थ्यांची चाळणी परीक्षा घेण्यासाठी मदत करतील.<br>४) निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी आदिवासी विकास विभाग तसेच आयुक्त आदिवासी विकास, नाशिक यांना देणे अंमलबजावणी यंत्रणेला बंधनकारक राहील.<br>५) ज्या विद्यार्थ्यांची निवड सुपर ५० मेडिकल व इंजिनीअरिंग म्हणून होईल त्या विद्यार्थ्यांची २ वर्षाची (११ वि व १२ वी) शिक्षणाची , राहण्याची व जेवणाची संपूर्ण जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची असेल.<br>६) विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रगतीचा आढावा प्रत्येकी ३ महिन्यांनी आयुक्त आदिवासी विकास,नाशिक व प्रकल्प अधिकारी,डहाणू यांना सादर करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील.<br>७) अंमलबजावणी यंत्रणेमार्फत प्रत्येक विषयानुसार विद्यार्थ्यांची परिपूर्ण तयारी करून घेणे तसेच प्रत्येक विद्यार्थ्यावर वैयक्तिक लक्ष केंद्रित करणे बंधनकारक असेल .<br>८) अंमलबजावणी यंत्रणेमार्फत विद्यार्थ्यांना राहण्याच्या परिसरात आपत्कालीन मेडीकल सुविधा पुरविणे बंधनकारक राहील .<br>९) योजना राबवितांना आवश्यक असणारा अभ्यासक्रम/प्रशिक्षण/कार्यशाळा व प्रात्यक्षिके संस्थेद्वारे देणे बंधनकारक असेल.<br>१०) प्रकल्प अधिकारी,डहाणू हे सदर योजनेसाठी समन्वय अधिकारी म्हणून कामकाज पाहतील . ते योजनेच्या प्रगतीबाबत वेळोवेळी प्रत्यक्ष भेटीद्वारे आढावा घेवून अहवाल सादर करतील व वेळोवेळी विद्यार्थ्यांबाबत उद्भवणा-या समस्यांचे निराकरण करतील.<br>११) अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेला केलेल्या कामाचा पूर्तता अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.<br>१२) सदर योजनेची अंमलबजावणी करताना चलचित्र (video) व छायाचित्रे काढावीत व योजनेची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर योजनेचा फलनिष्पत्ती अहवाल शासनास सादर करण्याची जबाबदारी आयुक्त आदिवासी विकास, नाशिक व अंमल बजावणी यंत्रणा यांची राहील तसेच योजनेची माहिती व लाभार्थ्यांची यादी हे www.stcmis.gov.in/smis या वेबसाईट वर अपलोड करण्याची जबाबदारी आयुक्त आदिवासी विकास, नाशिक व अंमलबजावणी यंत्रणा यांची राहील.<br>१३) योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने योजनेच्या प्रगतीबाबतची माहिती वेळोवेळी CAS पोर्टल वर भरण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची असेल. |
| १० | **सनियंत्रण व मूल्यमापन समिती** | **योजनेचे संनियंत्रण व मुल्यमापना करीता पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.**<br>१. आयुक्त, आदिवासी विकास,नाशिक -अध्यक्ष<br>२. सहसचिव/उपसचिव (केंद्रीय सहाय्य),आ.वि.वि - सदस्य<br>२. सर्व अप्पर आयुक्त,आदिवासी विकास -सदस्य<br>३.उपायुक्त(शिक्षण),आदिवासी आयुक्तालय ,नाशिक - सदस्य<br>४.शिक्षण क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती - - सदस्य<br>५. PACE संस्था प्रतिनिधी- - सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | | ६ . प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र, डहाणू – सदस्य सचिव<br>➢ योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने करण्यात येणारी कार्यवाही व योजनेची प्रगती याबाबत अहवाल उपरोक्त समितीस सादर करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील.<br>➢ योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून उपरोक्त समितीची बैठक दर ३ महीन्यांनी आयोजित करावी व सदर बैठकीमध्ये योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात यावा तसेच योजना अंमबलजावणीमध्ये काही अडचणी असतील तर त्यांचे निराकरणाबाबत आवश्यक कार्यवाही करावी.समितीची बैठक वागड पेस ग्लोबल स्कूल, विरार , जि. पालघर येथे आयोजित करण्यात यावी.<br>➢ विद्यार्थ्याची प्रगती तपासून विद्यार्थ्यांचा संस्थेमधील प्रवेश कायम ठेवण्याबाबत व योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने काही बदल करावयाचे असल्यास त्याबाबतचे अधिकार सनियंत्रण समिती व शासनास असतील. |
| ११ | **योजनेची अंमलबजावणीचा कालावधी** | शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून ०२ वर्ष |
| १२ | **निधी वितरणाची कार्य पद्धती** | **सदर योजनेकरिता निधी वितरणाची कार्यपद्धती खालील प्रकारे निश्चित करण्यात येत आहे.**<br>१) सदर योजनेचा निधी हा आदिवासी विकास विभागामार्फत आयुक्त,आदिवासी विकास नाशिक यांना वर्ग करण्यात येईल.<br>२) सदर निधी आयुक्त आदिवासी विकास ,नाशिक यांच्यामार्फत अंमलबजावणी यंत्रणेला वर्ग करण्यात येईल. प्रशिक्षणासाठी मंजूर निधी IITian Pace Education Pvt.Ltd यांना व शाळा/वस्तिगृह यांना मंजूर निधी PACE Educational Trust द्वारा व्यवस्थापित वागड पेस ग्लोबल स्कूल,विरार,जि.पालघर यांना वर्ग करण्यात येईल.<br>३) योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर आयुक्त आदिवासी विकास, नाशिक हे अंमलबजावणी यंत्रणेला कार्यारंभ आदेश देऊन योजनेसाठी प्रथम हफ्ता म्हणून मंजूर निधीच्या ५० टक्के निधी अंमलबजावणी यंत्रणेला वर्ग करतील. सदर निधी प्राप्त होताच व कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणा कार्यास सुरुवात करेल .<br>४) योजनेची अंमलबजावणी सुरु होऊन प्रथम वर्ष झाल्यानंतर मूल्यमापन व सनियंत्रण समितीच्या शिफारशीला अनुसार दुस-या वर्षाच्या सुरवातीला मंजूर निधीच्या ४० टक्के रक्कम अंमलबजावणी यंत्रणेला वर्ग करण्यात येईल .<br>५) उर्वरित १० टक्के निधी योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या पूर्ण केल्याबाबतचा अहवाल सादर केल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणेस तातडीने वितरीत करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | ६) योजनेच्या अनुषंगाने झालेल्या खर्चाचा अहवाल वेळोवेळी आयुक्त आदिवासी विकास नाशिक यांना सादर करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील.<br>७) ५० विद्यार्थ्यांसाठी (३४ अभियांत्रिकी प्रति विद्यार्थी-रू.११.२५ लक्ष) व १६ वैद्यकीय प्रति विद्यार्थी-रू.९.९२ लक्ष) २ वर्षाकरिता एकूण रू.५४१.२२ लक्ष निधी आवश्यक आहे.<br>८) सन २०१९-२० करिता IITians Pace Education- Super ५० Tribal students selected from engineering & medical aspirants for competitive exams and Olympiads अंतर्गत रू.५१२.०० लक्ष निधी प्राप्त झालेला आहे. सबब,उर्वरित निधी रू.२९.२२ लक्ष व निवड चाचणी परिक्षांकरिता संस्थेला देय खर्च रू.२.११ लक्ष असा एकूण रू.३१.३३ लक्ष निधी सन २०१४-१५ मध्ये विशेष केंद्रिय सहाय्य अंतर्गत मंजूर योजना " Talent Search mission,merit counseling and vocational education" अंतर्गत प्राप्त निधी रू.१०० लक्ष मधून भागविण्यात यावा.<br>९) तसेच Talent Search mission,merit counseling and vocational education" अंतर्गत प्राप्त निधीमधून रू.३५ लक्ष इतका निधी हा प्रकल्प अधिकारी,डहाणू यांच्या अधिनस्त या योजनेसाठी उघडलेल्या खात्यामध्ये जमा करण्यात येईल.या खात्यामधून विद्यार्थ्यांचे सुरक्षा अनामत रक्कम,विद्यार्थी अभ्यास सहल, तातडीची वैद्यकीय मदत , अतिरिक्त इंग्रजी प्रशिक्षण व अभ्यास साहित्य, विद्यार्थी प्रवास व वाहतुक खर्च,विद्यार्थ्यांना देय DBT व वस्तुरूपात किट इ. अनुषंगिक बाबींचा खर्च आवश्यकतेप्रमाणे करण्यात येईल.<br>१०) केंद्र शासनाने दोन वर्षाकरिता एकूण १०० विद्यार्थ्यांसाठी योजना मंजूर केलेली आहे. सन २०२०-२१ करिता या योजनेच्या प्रगतीनुसार रू.५४६.६२ लक्ष निधी वितरित करण्याचे PAC बैठकीच्या इतिवृत्तामध्ये नमूद केले आहे.प्रथम वर्षामधील योजनेची प्रगतीचा आढावा घेवून पुढील वर्षामध्ये ५० विद्यार्थ्यांची नवीन बॅच पुरस्कृत करणेबद्दल व योजना कार्यपद्धतीमध्ये आवश्यकतेनुसार सुयोग्य बदल करणेबद्दल निर्णय घेण्यास सनियंत्रण समिती सक्षम राहील . |
| १३ | **योजनेची फलनिष्पती** | जास्तीत जास्त आदिवासी विद्यार्थी NEET,IIT JEE यांसारख्या प्रवेश परीक्षांमध्ये उज्वल यश मिळवून वैद्यकीय व अभियांत्रिकीसाठी भारतातील नामवंत संस्थामध्ये प्रवेश मिळवतील. |